**मत्स्य विज्ञान महाविद्यालयात ‘लहान जलाशयातील मत्स्य संवर्धन’ तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे 11 ते 13 मार्च 2025 दरम्यान आयोजन**



मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर येथे आत्मा, लातूर पुरस्कृत **‘लहान जलाशयातील मत्स्य संवर्धन’** या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे दिनांक 11 ते 13 मार्च 2025 दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम नि:शुल्क असून मत्स्य व्यावसायिक व मत्स्य शेतकरी बांधवासाठी राबविण्यात येणार आहे. इच्छुक प्रशिक्षणार्थींनी दिनांक १०/०३/२०२५ पर्यंत आपले अर्ज **मा. सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य विज्ञान महाविद्यालय, कौळखेड रोड, पोस्ट बॉक्स नं. १७, उदगीर जि. लातूर** या पत्त्यावर पाठविण्यात यावे. सदरील अर्जासोबत मत्स्य व्यावसायिकांनी संस्थेचे सदस्य असल्याचे पत्र अथवा ७/१२ ची छायांकित प्रत जोडावी. प्रशिक्षण कार्यक्रम प्रवेश संख्या मर्यादित असून प्रथम येणाऱ्या अर्जांना प्राध्यान्य देण्यात येईल. अधिक माहितीसाठी डॉ. ए.एस. कुलकर्णी, प्रशिक्षण समन्वयक यांना 9860079826 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ मत्स्य व्यावसायिक व शेतकरी बांधवानी घ्यावा असे आवाहन डॉ. बी. आर. खरटमोल, सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर यांनी केले आहे.

